# प्रतीक्षा

मिळविण्या दिन दोन सुखाचे
भोगतो दिन दोनशे दुःखाचे
सवय मग अशीच लागते
राहून दूर सुख खुणाविते ||१||

असे खडतर वाट सुखाची
गुजरे किर्र दाट वनातूनी
पखरण पदोपदी काट्यांची
वणवा पेटलेला भोवताली ||२||

रूपही कधी सुखाचे कळे ना
उमगे क्षणिक परी वळे ना
राहते रूप  एक त्याचे जाताना
म्हणते मी आशा कर प्रतीक्षा ||३||

– नारायण
०९/२९/२३